दैनिक MAHILA SANVAD

# महिला संवाद

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

PUNE : Volume No. 1, Issue No. 278, Marathi Daily Friday, Date - 15 May 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २७८ वा | मराठी दैनिक | शुक्रवार दि. १५ मे २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धामिर्क, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

महिला संवाद

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

## मालमत्तेसाठी दबाव आणि अत्याचार?

### आळंदीत विवाहितेवर घरात घुसून सामूहिक अत्याचार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील आळंदी परिसरात एका विवाहित महिलेला घरात घुसून मारहाण करत सामूहिक लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

केवळ अत्याचारच नव्हे, तर संबंधित महिलेचे घर आपल्या नावावर करून देण्यासाठी आरोपींकडून सातत्याने धमक्या दिल्या जात असल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी दिघी पोलीस ठाण्यात सात जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपासाला वेग दिला आहे.

पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, ७ एप्रिल २०२६ रोजी आरोपी तिच्या घरात जबरदस्तीने घुसले. यावेळी त्यांनी महिलेला शिवीगाळ करत मारहाण केली. त्यानंतर तिच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून घेत जबरदस्तीने सामूहिक लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या



घटनेदरम्यान आरोपींनी पीडितेला मोठ्या प्रमाणात मानसिक त्रास दिला.


हे घर आमच्या नावावर कर, नाहीतर घर विकून आम्हाला पैसे दे. अन्यथा तुला आणि तुझ्या कुटुंबाला सतत त्रास देऊ, अशी धमकी आरोपींनी दिल्याचे महिलेने तक्रारीत नमूद केले आहे. आरोपींकडून पीडित महिलेवर मालमत्ता हस्तांतरणासाठी दबाव टाकला जात असल्याचेही प्राथमिक तपासात समोर येत आहे.

फिर्यादीत नमूद केल्यानुसार, हा प्रकार केवळ एका दिवसापुरता मर्यादित नव्हता. चार ते पाच महिन्यांपूर्वीही आरोपी महिलेच्या घरी आले होते. त्यावेळीही तिचा जबरदस्तीने शारीरिक छळ करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच तिच्या नातेवाईकांशी गैरवर्तन करण्यात आले आणि सोशल मीडियावर बदनामी करण्याच्या धमक्या देण्यात आल्याचाही दावा पीडितेने केला आहे. या प्रकरणी अभिमन्यू आंधळे, नारायण खंदारे, श्याम महाराज राठोड, राहुल सुरेश चोरडिया, कानीफनाथ गुलाबराव घुले, युवराज खरमाटे आणि एका महिलेविरोधात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पीडित महिलेने २४ एप्रिल २०२६ रोजी दिघी पोलीस ठाण्यात अधिकृत फिर्याद दिल्यानंतर पोलिसांनी भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेच्या सर्व पैलूंवर तपास सुरू असून आरोपींची चौकशी केली जात आहे. या प्रकरणामागे मालमत्ता वाद, दबाव टाकून आर्थिक फायदा मिळवण्याचा प्रयत्न किंवा अन्य कोणते कारण आहे का, याचाही तपास पोलिसांकडून केला जात आहे. दरम्यान, या घटनेमुळे आळंदी परिसरात मोठी खळबळ उडाली असून महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि पीडित महिलेला न्याय मिळावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## प्रेमसंबंधांच्या वादातून रक्तरंजित शेवट; पुण्यात प्रियकराची हत्या

**पुणे | प्रतिनिधी**



पुण्यात आईच्या प्रियकराचा मुलीच्या प्रियकराने खून केल्याची घटना काळेपडळ येथे घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी सराईत गुन्हेगारासह सहा जणांना अटक केली आहे. प्रेमसंबंध तोडण्यासाठी तरुणीच्या आईच्या प्रियकराने टाकलेला दबाव आणि त्याने दिलेल्या धमकीमुळे त्याचा खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना हडपसरमधील काळेपडळ परिसरात घडली. खून केल्याप्रकरणी तरुणीच्या प्रियकरासह साथीदारांना काळेपडळ पोलिसांनी अटक केली आहे. अटक करण्यात आलेला प्रियकर हा सराईत गुन्हेगार आहे.

या प्रकरणी दुर्वांग ऊर्फ पारस सुनील मानकर (वय २१, रा. हिराबाग, शुक्रवार पेठ, टिळक रस्ता), पारस किशोर गायकवाड (वय २१, रा. दत्तवाडी, सिंहगड रस्ता), अभिजित उर्फ अभी संजय इंगळे (वय २२), सोमनाथ रमेश दोरकर (वय २१), साहिल सागर शेलार (वय २४, सर्व रा. हडपसर), चंद्रशेखर सोमनाथ जावीर (वय २०, रा. सुखसागरनगर, कात्रज) यांना अटक करण्यात आली. गणेश संजू बिरादार (वय २५, रा. ससाणेनगर, हडपसर) असे खून झालेल्याचे नाव आहे. ३ मे रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास बिरादार यांचा खून झाला होता. याबाबत बिरादार याच्या पत्नीने फिर्याद दिली होती. अधिक तपास काळेपडळ पोलिस करत आहेत. पुण्यात भरचौकात एका व्यक्तीचा धारदार शस्त्राने वार करून खून केल्याची घटना समोर आली होती. या हत्याकांडाचा उलगडा करण्यात पुणे पोलिसांना यश आलं. आईच्या बॉयफ्रेंडने प्रेमसंबंध तोडण्यासाठी दबाव टाकल्याने आणि धमकी दिल्यामुळे मुलीच्या प्रियकराने त्याची हत्या केली. पुण्यातील हडपसरमधील काळेपडळ परिसरात ३ मे रोजी ही घटना घडली होती. या हत्याकांडाप्रकरणी सराईत गुन्हेगारासह ६ जणांना पोलिसांनी अटक केली.

## थोडक्यात...

### पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या महत्त्वाच्या उपाययोजना जाहीर

**मुंबई | प्रतिनिधी**

पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना ऊर्जा बचत, सार्वजनिक वाहतुकीचा वापर, स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन आणि अनावश्यक खर्च टाळण्याचे आवाहन केले आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने विविध विभागांसाठी महत्त्वाच्या उपाययोजना जाहीर केल्या आहेत. राज्य शासनाच्या प्रस्तावित उपाययोजनांमध्ये परदेश दौऱ्यांवर निर्बंध, सार्वजनिक वाहतूक वापर वाढविणे, ऊर्जा बचत, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन, तसेच डिजिटल माध्यमातून बैठका घेण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. शासकीय अधिकाऱ्यांचे परदेश दौरे तात्पुरते रद्द करण्यात येणार असून, नव्या दौऱ्यांचे नियोजन टाळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, वाहनांच्या वापरात कपात करून कारपूलिंग, सार्वजनिक वाहतूक आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किमान एक दिवस मेट्रो, लोकल किंवा बसने प्रवास करण्याचेही सुचविण्यात आले आहे. मंत्रालय स्तरावरील, विभागीय स्तरावरील व जिल्हा स्तरावरील कार्यालयीन कामकाजासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगचा वापर वाढवून बैठका, प्रशिक्षण आणि सेमिनार ऑनलाइन घेण्यावर भर देण्यात येणार आहे. विद्यापीठे आणि महाविद्यालयांनाही याचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

ऊर्जा बचतीसाठी कार्यालयांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा वापर, अनावश्यक दिवे व उपकरणे बंद ठेवणे, तसेच वातानुकूलन यंत्रणेचे तापमान २४ ते २६ अंशांदरम्यान ठेवण्याचे निर्देश आहेत. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्यावरही भर देण्यात येणार आहे. इंधन बचतीसाठी पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्याबरोबरच पीएनजी (झछ्न) गॅसचा वापर वाढविण्यासाठी प्रलंबित प्रस्तावांना तातडीने मंजुरी देण्यात येणार आहे. मुंबईसह मोठ्या शहरांतील हॉटेल्स व रेस्टॉरंट्सनाही पीएनजी वापरासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे.

खाद्यतेलाच्या वापरात कपात करण्यासाठी शासकीय कॅन्टीन, अंगणवाडी, रुग्णालये आणि वसतिगृहांमध्ये मेन्यूत बदल करण्यात येणार असून, पाम व सोयाबीन तेलाऐवजी शेंगदाणा व मोहरी तेलाच्या वापराला चालना दिली जाणार आहे. आशा व अंगणवाडी सेविकांमार्फत जनजागृतीही केली जाणार आहे. कृषी क्षेत्रात रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून नैसर्गिक, जैविक आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी मोहीम राबविण्यात येणार आहे. माती परीक्षणावर आधारित पीकनिहाय मार्गदर्शन देण्यात येणार असून, खतांचा गैरवापर रोखण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच, पोलीस विभागाकडून वाहनांच्या मिरवणुका, बाईक रॅलींना परवानगी नाकारण्यात येणार असून, शासकीय जाहिराती व खर्चिक उपक्रमांवरही मर्यादा आणण्यात येणार आहेत. याशिवाय, पुढील सहा महिन्यांसाठी सल्लागारांची नियुक्ती टाळण्याचे निर्देश सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आले आहेत.

## नवी मुंबईत मोठी कारवाई; अप्पर जिल्हाधिकारी रंगेहाथ जाळ्यात

**मुंबई | प्रतिनिधी**

राज्यात गेल्या काही महिन्यात एसीबीने कारवाईचा धडाका लावला असून शिपायापासून ते तहसीलदार, अप्पर जिल्हाधिकाऱ्यापर्यंतच्या अधिकाऱ्यांना लाच घेताना अटक केली आहे.

या कारवाईने प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली असली तरीही लाच घेण्याचं सुरूच असल्याचं दिसून येत आहे. दुसरीकडे एसीबीनेही कारवाई करत धाडसत्र सुरूच ठेवल्याचं आज पुन्हा एकदा पाहायला मिळालं. नवी मुंबईतील सिडको येथे थेट अप्पर जिल्हाधिकाऱ्यास २२ हजारांची लाच घेताना एसीबी पोलिसांनी अटक केली आहे.




लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नवी मुंबईत लाचप्रकरणात मोठी कारवाई केली असून सिडकोच्या भूमी व भूमापन अधिकाऱ्याला अटक करण्यात आली आहे. अप्पर जिल्हाधिकारी रामदास जगताप यांना २२ हजारांची लाच घेताना एसीबीच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडलं. रामदास जगताप याला सिडको कार्यालयातच रंगेहाथ अटक करण्यात आल्याने सिडकोसह प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. नवी मुंबई एसीबीकडून अप्पल जिल्हाधिकाऱ्यांविरुद्ध अटकेची कारवाई करण्यात आली असून या कारवाईने प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

## उष्माघाताने नवविवाहितेचा दुर्दैवी अंत

**जळगाव | प्रतिनिधी**

गेल्या आठवड्याभरापासून महाराष्ट्रात तापमानाचा पारा प्रचंड वाढला आहे. जळगाव जिल्ह्यात सध्या वाढत्या उन्हामुळे अंगाची लाही लाही होताना दिसत आहे. सध्या जळगावात तापमानाने ४५ अंशाचा टप्पा ओलांडला आहे. या भीषण उष्णतेने दोघांचा बळी घेतल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या मृतांमध्ये एका २० वर्षीय नवविवाहितेचा आणि एका ६९ वर्षीय पुजाऱ्याचा समावेश आहे. या घटनांमुळे संपूर्ण जिल्ह्यात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.



जळगावच्या जामनेर तालुक्यातील मोहाडी येथे पहिली घटना घडली. वैशाली सुनील मोरे या २० वर्षीय तरुणीला उष्माघाताची तीव्र लक्षणे जाणवू लागली होती. तिला तातडीने प्राथमिक उपचार देऊन पुढील उपचारासाठी जळगाव येथील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, दुर्दैवाने रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच तिची प्राणज्योत मालवली. विशेष म्हणजे, वैशालीचा विवाह केवळ २० दिवसांपूर्वीच झाला होता. लग्नानंतर सुखाचे दिवस पाहण्यापूर्वीच काळाने तिच्यावर झडप घातली. त्यामुळे मोहाडी परिसरात शोककळा पसरली आहे.

## स्थायी समिती सभेत पायाभूत सुविधा व विकासकामांसह विविध विषयांना मान्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधूकर पवळे सभागृहात आज पार पडली. सभेमध्ये शहरातील पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, रस्ते दुरुस्ती, आरोग्य, शिक्षण, सुरक्षा, जाहिरात व्यवस्थापन तसेच विविध विकासकामांशी संबंधित महत्त्वाच्या विषयांना मान्यता देण्यात आली. यावेळी स्थायी समिती सदस्यांसह आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप तसेच महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

स्थायी समिती सभेत शहरातील विविध गावांमध्ये नगररचना योजना राबविण्यासाठी नियुक्त सल्लागार संस्थेस मुदतवाढ देणे तसेच संरक्षण विभागाला विविध ठिकाणसाठीच्या रहिवासी सदनिका उभारणी कामांसाठी मंजुरी देण्यात आली. याशिवाय शहरातील पाणीपुरवठा आणि जलनिस्सारण व्यवस्था सक्षम करण्यासाठी विविध कामांना मान्यता देण्यात आली. ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक १७ मधील बिजलीनगर, बळवंतनगर, रस्टन कॉलनी परिसरातील जुन्या पाइपलाइन बदलून नवीन पाइपलाइन टाकण्यास मंजुरी देण्यात आली. दापोडी भागात आवश्यकतेनुसार एचडीपीई व डीआय पाइपलाइन टाकणे, नवी सांगवी व जुनी सांगवी परिसरात नवीन पाइपलाइन टाकणे आणि इतर अनुषंगिक कामांना मान्यता देण्यात आली.

जलशुद्धीकरण केंद्र सेक्टर २३ येथे नवीन ऑटो-क्लोरीनेशन सिस्टीम बसविणे तसेच तिची देखभाल-दुरुस्ती करण्यास मंजुरी देण्यात आली. सेक्टर २३, निगडी व चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रांसाठी निर्जंतुकीकरण प्रक्रियेस आवश्यक क्लोरीन गॅस खरेदी तसेच आवश्यक रसायनांच्या खरेदीलाही मान्यता देण्यात आली. ग क्षेत्रीय कार्यालयांतर्गत थेरगाव गावठाण, रहाटणी आणि पिंपरी परिसरातील जलनिस्सारण सुधारणा, नवीन जलनिस्सारण नलिका टाकणे तसेच विद्यमान नलिकांची देखभाल-दुरुस्ती करण्यास मंजुरी देण्यात आली. ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध भागांतील जलनिस्सारण विषयक कामांना मान्यता देण्यात आली. प्रभाग क्रमांक १ मध्ये आवश्यक ठिकाणी स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे तसेच पिंपरीतील मिलिंदनगर, कैलासनगर, वैभवनगर आणि महात्मा गांधी नगर परिसरातील जलनिस्सारण विषयक कामांनाही मंजुरी देण्यात आली.

रस्ते, फुटपाथ आणि स्थापत्य विषयक विविध विकासकामांनाही स्थायी समितीने मान्यता दिली. प्रभाग क्रमांक २५ मधील वाकड, पुनावळे, ताथवडे परिसरातील नव्याने ताब्यात येणारे रस्ते विकसित करणे, स्थापत्य विषयक देखभाल-दुरुस्ती कामे करणे तसेच पावसाळी पाण्याच्या लाईनची दुरुस्ती व नवीन लाईन टाकण्याची कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. प्रभाग क्रमांक २८ पिंपळे सौदागर आणि प्रभाग क्रमांक २९ पिंपळे गुरव परिसरातील फुटपाथ व पेव्हिंग ब्लॉक दुरुस्तीची कामे, तसेच मनपाच्या इमारती व स्मशानभूमींमधील स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करण्यास मान्यता देण्यात आली.

प्रभाग क्रमांक ६ मधील धावडेवस्ती, गुळवेवस्ती, भगतवस्ती, चक्रपाणी वसाहत, देवकर वस्ती, सद्गुरूनगर, महादेवनगर, लांडगेवस्ती परिसरातील रस्त्यांचे ऑटोमेटेड सर्वेक्षणानुसार डांबरीकरण व दुरुस्ती कामांना मंजुरी देण्यात आली. ग क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक २१ पिंपरी, प्रभाग क्रमांक २३ थेरगाव गावठाण, प्रभाग क्रमांक २४



बेलठिकानगर आणि प्रभाग क्रमांक २७ रहाटणी येथील रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामांनाही मान्यता देण्यात आली. काळेवाडी येथील ज्योतिबा गार्डनमध्ये कुस्तीचा आखाडा उभारण्यास तसेच पिंपळे निलख येथील सर्व्हे क्रमांक २८ मध्ये महिला बाजार हट केंद्र उभारणीस मंजुरी देण्यात आली. याच परिसरातील महापालिकेच्या ताब्यातील मोकळ्या जागेचे काँक्रीटीकरण व इंटरलॉकिंग ब्लॉक बसविण्याच्या कामांनाही मान्यता देण्यात आली. प्रभाग क्रमांक १८ मधील दत्तात्रय मरळ उद्यान ११ महिन्यांच्या कालावधीसाठी मानधन तत्वावर चालविण्यास देण्याचा निर्णय घेण्यात आला.

शिक्षण आणि प्रशासकीय कामकाजाशी संबंधित विषयांनाही सभेत मंजुरी देण्यात आली. महापालिकेच्या ई-लर्निंग प्रकल्पांतर्गत शाळा व कार्यालयांसाठी इंटरनेट बँडविड्थ सेवा उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच लेखा विभागासाठी सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२७ चे मूळ अंदाजपत्रकीय पुस्तके छपाई करून पुरवठा करण्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. आरोग्य आणि देखभाल व्यवस्थेसंदर्भातही विविध निर्णय घेण्यात आले. प्रभाग क्रमांक २१ मधील जिजामाता रुग्णालयात स्थापत्य विषयक कामे करण्यासही मंजुरी देण्यात आली.

महानगरपालिकेच्या विविध विभागांसाठी मनुष्यबळ आणि सुरक्षा व्यवस्थेसंदर्भातही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत दैनंदिन देखभाल-दुरुस्तीसाठी मनुष्यबळ पुरविण्याच्या खर्चास मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळासोबत नव्याने करारनामा करून २१८ सुरक्षा रक्षकांच्या वेतनासाठी येणाऱ्या खर्चालाही मान्यता देण्यात आली. ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक ३१ व ३२ मधील सार्वजनिक शौचालयांच्या दैनंदिन साफसफाईसाठी होणाऱ्या खर्चासही मान्यता देण्यात आली. याशिवाय अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत मोरवाडी आयटीआय व इतर इमारतींमधील विद्युत व्यवस्थेचे नूतनीकरण, जुनी सांगवी येथील शाळा इमारतींची स्थापत्य व रंगरंगोटी कामे तसेच विविध विकासकामांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी स्थापत्य, उद्यान व क्रीडा विभागामार्फत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करण्यासही स्थायी समितीने मान्यता दिली.

शहराच्या सर्वांगीण विकासाला गती देण्याच्या दृष्टीने स्थायी समिती सभेत पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, रस्ते दुरुस्ती, आरोग्य, शिक्षण, सुरक्षा तसेच मेट्रोसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांशी संबंधित विविध विषयांना मान्यता देण्यात आली आहे. नागरिकांना अधिक दर्जेदार आणि सक्षम नागरी सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच शहराच्या वाढत्या गरजांनुसार विकासकामे वेळेत पूर्ण करणे यावर महापालिकेचा भर राहणार आहे. विकासकामांमध्ये सुसूत्रता, पारदर्शकता आणि गुणवत्तेला प्राधान्य देत शहराच्या सर्व भागांमध्ये मूलभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे.

\- अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## संपादकीय...

# महापालिका की आखाडा?

जालना महानगरपालिका ही शहराच्या विकासासाठी उभी केलेली लोकशाहीची संस्था आहे की सत्तेच्या नशेत बेशिस्त झालेल्या राजकारण्यांचा आखाडा - हा प्रश्न आता नागरिक उघडपणे विचारू लागले आहेत. कारण सभागृहात चर्चा कमी आणि आरडाओरड जास्त, विकास कमी आणि दादागिरी जास्त, काम कमी आणि राडे जास्त दिसू लागले आहेत.

ज्या महापालिकेत नागरिकांच्या कराच्या पैशातून पगार घेतले जातात, त्याच महापालिकेत आता शिवीगाळ, धक्काबुक्की, मारहाण, ट्रॉसिटीचे गुन्हे आणि जीवघेण्या हल्ल्यांच्या बातम्या बाहेर येत असतील, तर ही केवळ लाजिरवाणी बाब नाही, तर लोकशाहीच्या तोंडावरचा काळा डाग आहे.

सत्ताधाऱ्यांनी हे लक्षात ठेवायला हवे की जनता तुम्हाला मालक बनवण्यासाठी निवडून देत नाही. तुम्ही जनतेचे सेवक आहात. पण सध्या महापालिकेतील काहींची भाषा, वागणूक आणि मस्ती पाहिली तर जणू शहर त्यांच्या बापजाद्यांची जहागीर असल्यासारखे चित्र दिसते. सभागृहात प्रश्न विचारला की संताप, विरोध झाला की धमक्या, आणि मतभेद झाले की थेट पोलीस ठाणे - ही लोकशाहीची भाषा नाही; ही सत्तेच्या अहंकारातून आलेली गुंडशाही आहे.

शहरातील रस्ते खड्ड्यात गेले, पाण्याचा प्रश्न कायम आहे, कचऱ्याचे साम्राज्य वाढत आहे, बेरोजगारी वाढत आहे; पण लोकप्रतिनिधींना नागरिकांच्या प्रश्नांपेक्षा स्वतःची राजकीय टोळी मजबूत करण्यात अधिक रस दिसतो. जणू महापालिका विकासाचे केंद्र नसून गँगवॉरचे मैदान बनले आहे.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे या सगळ्या प्रकारानंतरही कुणाच्याही चेहऱ्यावर पश्चात्ताप दिसत नाही. उलट प्रत्येक जण स्वतःलाच बरोबर सिद्ध करण्यात व्यस्त आहे. जनता मात्र हे सगळं उघड्या डोळ्यांनी पाहते आहे. लोकांचा संयम संपत चालला आहे. कारण नागरिकांनी मत दिलं होतं विकासासाठी, तमाशासाठी नाही.

महापालिकेच्या सभागृहात जर लोकप्रतिनिधीच कायदा हातात घेत असतील, तर सामान्य माणसाने काय शिकायचं? शहर चालवणारेच जर रस्त्यावरच्या भांडणाच्या पातळीवर उतरले, तर प्रशासनाचा धाक आणि लोकशाहीचा मान दोन्ही संपायला वेळ लागणार नाही.

आज गरज आहे ती कठोर कारवाईची. पक्ष कोणताही असो, पद कितीही मोठं असो - सभागृहाला आखाडा बनवणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे. अन्यथा उद्या नागरिकांचाही व्यवस्थेवरचा विश्वास उरणार नाही.

लोकशाहीत खुर्ची कायमची नसते; पण जनतेचा रोष कायम लक्षात राहतो. सत्तेच्या मस्तीत हे विसरणाऱ्यांना जनता योग्य वेळी जागा दाखवतेच.

**दैनिक महिला संवाद वर्तमानपत्र**
**संपादक**
**ज्योती आडेकर**

# समजून घेणं आणि जगून घेणं..

आयुष्य जगताना प्रत्येक माणूस सतत काही ना काही शोधत असतो. कधी नात्यांचा अर्थ, कधी माणसांच्या वागण्यामागचं कारण, तर कधी स्वतःच्या वेदनांचं उत्तर. प्रत्येक गोष्ट समजून घेण्याच्या प्रयत्नात आपण इतके गुंतून जातो की, नकळत आयुष्य जगायचंच राहून जातं. खरंतर आयुष्य हे प्रत्येक प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी नसतं, तर प्रत्येक क्षण अनुभवण्यासाठी असतं....

म्हणूनच समजून घेणं आणि जगून घेणं यातलं एक निवडायचं झालं, तर कायम जगून घेणंच निवडावं. कारण जगता जगता अनेक गोष्टी आपोआप समजतात, पण फक्त समजून घेण्याच्या प्रयत्नात आयुष्य मात्र हातातून निसटून जातं....

आयुष्य समजून घेण्याच्या प्रयत्नात हरवत जाणं आजचा माणूस प्रत्येक गोष्टीमागचं कारण शोधत जगतो. कोण बदललं, का बदललं, कोण सोडून गेलं, आपल्यालाच दुःख का मिळालं, आपल्या भावना कोणाला का समजल्या नाहीत - अशा असंख्य प्रश्नांनी मन कायम भरलेलं असतं. या प्रश्नांची उत्तरं शोधताना मन अधिक थकत जातं. काही गोष्टींचं स्पष्टीकरण मिळत नाही, काही नाती अपूर्ण राहतात आणि काही जखमा काळासोबतच भरून येतात....

पण माणूस त्या वेदनांना समजून घेण्याच्या नादात वर्तमानातील आनंद गमावून बसतो...

कधी कधी आपण भूतकाळात इतके अडकतो की वर्तमानात जगणंच विसरतो. सतत विचार करत राहणं, प्रत्येक गोष्टीचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करणं आणि प्रत्येक माणसाकडून अपेक्षा ठेवणं, यामुळे मन अधिक अस्वस्थ होतं. कारण आयुष्य हे नेहमी आपल्या मनासारखं घडत नाही. काही प्रसंग स्वीकारावे लागतात, काही माणसं विसरावी लागतात आणि काही गोष्टी उत्तरांशिवाय सोडून द्याव्या लागतात....

जगून घेणं म्हणजे नेमकं काय?

जगून घेणं म्हणजे निष्काळजीपणे जगणं नाही. तर प्रत्येक क्षण मनापासून स्वीकारणं. दुःख असतानाही हसता येणं, अपूर्णता असतानाही समाधान शोधणं आणि तुटलेल्या मनानेही पुन्हा उभं राहणं - हेच खरं जगून घेणं असतं... आयुष्यात सगळं परिपूर्ण कधीच नसतं. प्रत्येकाच्या वाट्याला संघर्ष, वेदना, अपयश आणि एकटेपण येतंच. पण जे लोक या सगळ्यातूनही स्वतःला सावरून पुढे चालत राहतात, तेच खऱ्या अर्थाने आयुष्य जगतात. ते प्रत्येक गोष्टीचा अर्थ शोधण्यात वेळ घालवत नाहीत, तर जे आहे ते स्वीकारून पुढे जाणं शिकतात....

जगून घेणारा माणूस छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधतो. एखाद्या शांत संध्याकाळीत, पावसाच्या सरीत, आवडत्या माणसाच्या आठवणीत किंवा स्वतःसोबत घालवलेल्या निवांत क्षणांमध्ये तो आयुष्य अनुभवत राहतो. त्याला माहित असतं की, प्रत्येक गोष्ट कायमची नसते, म्हणूनच प्रत्येक क्षण जपून जगायचा असतो... जेव्हा माणूस स्वतःशी शांत होतो आणि आयुष्य स्वीकारायला शिकतो, तेव्हा त्याच्या आयुष्यात योग्य माणसंही येऊ लागतात. सतत तक्रारी करणाऱ्या, प्रत्येक गोष्टीत अर्थ शोधणाऱ्या मनापेक्षा शांत आणि समंजस मनाकडे लोक अधिक आकर्षित होतात...

समजून घेणारी माणसं शोधून मिळत नाहीत, ती आपल्या जगण्याच्या पद्धतीतून भेटतात. आपण स्वतः आयुष्याकडे सकारात्मक नजरेने पाहायला लागलो, स्वतःला स्वीकारलं आणि मनावरचं ओझं कमी केलं, की नकळत आपल्याला समजून घेणारी, साथ देणारी माणसं आयुष्यात येतात....

आयुष्य हे प्रत्येक प्रश्नाचं उत्तर शोधण्याचं साधन नाही. काही गोष्टी फक्त अनुभवायच्या असतात. सतत समजून घेण्याच्या प्रयत्नात आपण जगणं हरवून बसतो, तर जगून घेण्याचा निर्णय घेतला की आयुष्य हलकं वाटू लागतं. प्रत्येक क्षणाचा स्वीकार करून, स्वतःला आणि परिस्थितीला समजून घेत पुढे चालत राहणं, हेच खरं जगणं आहे... म्हणूनच आयुष्यात कधी निवड करायची वेळ आली, तर समजून घेण्यापेक्षा जगून घेणं निवडावं. कारण उत्तरं कधीतरी मिळतातच, पण निसटून गेलेले क्षण मात्र पुन्हा कधीच परत येत नाहीत...

**दैनिक महिला संवाद वर्तमानपत्र**
**संपादक**
**ज्योती आडेकर**

# मतीन पटेल यांच्या घरावर बुलडोझर; इम्तियाज जलीलांचा संताप

**छ.संभाजीनगर | प्रतिनिधी**

नाशकातील टीसीएस धर्मांतरण आणि लैंगित छळप्रकरणात आज छत्रपती संभाजीनगरमधील नारेगावात हायहोल्टेज ड्रामा समोर आला. याप्रकरणातील आरोपी निदा खान हिला आश्रय दिल्याप्रकरणात एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांना मोठा झटका बसला. त्यांचे नारेगावातील घर आज बुलडोजर कारवाई करून पाडण्यात आले. त्यावरून माजी खासदार इम्तियाज जलील यांनी मोठा संताप व्यक्त केला. त्यांनी यावेळी महापालिकेवर आरोप केले. तर मंत्री संजय शिरसाट यांच्यावर टीका केली.

मी मतीन यांच्या कुटुंबांचे अभिनंदन करतो. त्यांनी महापालिका अधिकारी आणि पोलिसांवर फुलांचा वर्षाव केला. या देशात आज जे सुरू आहे. या राज्यात जे सुरू आहे. त्याचा आम्ही सुरुवातीपासून निषेध करत आहेत. एखाद्या व्यक्तीवर आरोप होतो आणि काही संघटना, पक्षाचे नेते त्यांना दोषी ठरवतात. महापालिकेला प्रश्न विचारायला हवा की या शहरात केवळ एकच घर आहे का, जे अवैध आहे. बेकायदेशीर आहे. जर ते बेकायदेशीर असेल तर त्याबद्दल दुमत नाही. पण तुमच्या राजकीय भाकरी भाजण्यासाठी अशा ज्या कारवाई करण्यात येत आहे, त्याचा आम्ही निषेध करत आहोत. सुप्रीम कोर्टाच्या निवड्याप्रमाणे मतीन पटेल यांच्या वकिलांनी हायकोर्टाकडे १५ दिवसांची मुदत मागितली होती. कोणतेही घर पाडण्याअगोदर १५ दिवसांची नोटीस द्या अशी सुप्रीम कोर्टाची ऑर्डर आहे. खुलासा आल्यानंतर जी कारवाई करायची ती करा. पण महापालिका आणि सरकारी वकीलांना हे मान्य नव्हते. सुनावणी होऊन २४ तासही उलटले नाहीत. काय इतकी घाई होती घर पाडण्याची? भल्या पहाटे ४ वाजता पोलीस, अधिकारी यांना नारेगावमध्ये पाचारण करण्यात आले.



सकाळी ६ वाजता हे घर पाडण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. काही राष्ट्रीय सुरक्षेचा विषय होता का? हे घर राष्ट्रासाठी धोकादायक होतं का? असा सवाल माजी खासदार इम्तियाज जलील यांनी विचारला.

मतीन यांच्या घरावर दुपारी १२ वाजता महापालिकेने नोटीस चिटकवली आणि २४ तासांच्या आत कारवाई केली. मी नारेगावला गेलो. त्यांच्या कुटुंबियांना भेटलो. त्यांच्या परिसरातील लोकांना भेटलो. मी सर्वांना एकच गोष्ट सांगितली की मतीनवर अजून आरोप सिद्ध झालेले नाही. राजकीय पक्षाचे नेते आरोप सिद्ध करणार नाहीत. संघटना आणि मीडिया असे मिळून एका व्यक्तीवर आरोप करतात, त्याला दोषी ठरवतात, हे दुर्दैवी आहे. यामध्ये मतीनच्या आई-वडिलांची, त्याच्या पत्नी आणि मुलाची काय चूक आहे, असा सवाल जलील यांनी विचारला. ज्या माणसाचं घर तुम्ही पडलय,, त्याला आतापर्यंत दोषी ठरवण्यात आलेलं नाही. आम्ही त्याचं घर पुन्हा अलिशान बांधून देणार. प्रत्यकोकडून लोकवर्गणी जमा करणार. आम्ही आमचे योगदान देणार. जलील यांनी पुन्हा मतीन पटेल यांची पाठराखण केली.

मी जर बोललो की, मंत्री संजय शिरसाट आणि भोंदू अशोक खरात नातेवाईक आहे तर ते मला सिद्ध करून दाखवावं लागेल. संजय सिरसाट काही न्यायालय आहे का. मी शिरसाट यांच्या आरोपांना काडी मात्र महत्व देत नाही. त्यांनी सिद्ध करावं की निदा खान ही माझी नातेवाईक आहे. त्यांना नाहीतर मी कोर्टात खेचणार आहे. असे चोर भामटे लोक माझ्या शहराचे पालकमंत्री असेल तर त्यांची इज्जत करणार नाही असे जलील म्हणाले.

# २२ लाख विद्यार्थ्यांचे स्वप्न उद्ध्वस्त; राहुल गांधींची केंद्र सरकारवर टीका

**मुंबई | प्रतिनिधी**



नीट परीक्षा रद्द झाल्यानंतर लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकार आणि भाजपवर तीव्र शब्दांत हल्लाबोल केला आहे. पेपर लीक प्रकरणामुळे २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचे स्वप्न उद्ध्वस्त झाल्याचा आरोप करत त्यांनी या संपूर्ण प्रकाराला तरुणांच्या भविष्यासोबतचा गुन्हा असे संबोधले. राहुल गांधी यांनी म्हटले की, देशभरातील लाखो विद्यार्थ्यांनी रात्रंदिवस अभ्यास करून, कुटुंबांनी कर्ज काढून आणि आई-वडिलांनी दागिने विकून मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. मात्र त्यांना बदल्यात मिळाले ते पेपर लीक, भ्रष्टाचार आणि प्रशासनिक गोंधळ. ही केवळ प्रशासकीय चूक नसून देशातील प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या भविष्याशी केलेला गंभीर अन्याय आहे, असा आरोप राहुल गांधी यांनी केला. राहुल गांधी यांनी आरोप केला की, प्रत्येक वेळी पेपर लीक प्रकरणात 'पेपर माफिया' सुटून जातात आणि त्याची शिक्षा मात्र मेहनती विद्यार्थ्यांना भोगावी लागते. अशा घटनांमुळे देशातील शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास सतत ढासळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

परीक्षा रद्द झाल्यामुळे आता विद्यार्थ्यांना परीक्षेची पुन्हा तयारी करावी लागणार, मानसिक तणाव सहन करावा लागणार आहे. तसेच त्यांच्यावरील आर्थिक भार वाढणार असून भविष्यासंदर्भात अनिश्चितता निर्माण होणार असल्याचं राहुल गांधी म्हणाले. जर शिक्षणात मेहनतीपेक्षा पैसा आणि प्रभाव अधिक महत्त्वाचा ठरत असेल, तर गुणवत्तेचे महत्त्वच संपुष्टात येईल, असं म्हणत राहुल गांधींनी अनेक प्रश्न उपस्थित केले.


राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर थेट निशाणा साधत म्हटले की, सरकार ज्या काळाला अमृतकाल म्हणते, तोच देशातील तरुणांसाठी विषकाल ठरत आहे. विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवण्यात सरकार अपयशी ठरल्याचा आरोप त्यांनी केला.

# ट्रेकिंगचा आनंद क्षणात दुःखात; इरशाळवाडीत डोंबिवलीच्या तरुणाचा मृत्यू

**मुंबई | प्रतिनिधी**

उन्हाची तीव्रता, डोंगर चढाईचा थरार आणि मित्रांसोबतचा ट्रेक पण या आनंदाच्या क्षणांवर काळाने अचानक झडप घातली. खालापूर तालुक्यातील इरशाळवाडी इथं ट्रेकिंगसाठी गेलेल्या डोंबिवलीतील २० वर्षीय तरुणाचा ट्रेकिंगदरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला आहे. रितेश कोणका असं या तरुणाचं नाव असून या घटनेमुळे डोंबिवलीत हळहळ व्यक्त केली जात आहे. रितेश पश्चिम डोंबिवलीतील कोपर परिसरात राहत होता. मिळालेल्या माहितीनुसार, रितेश हा आपल्या गिर्यारोहक मित्रांसोबत रविवारी ११ मे रोजी इरशाळवाडी इथं ट्रेकिंगसाठी गेला होता. चढाई सुरू असताना अचानक त्याला चक्कर आली आणि तो खाली कोसळला.

रितेशच्या मित्रांनी तात्काळ त्याला पाणी पाजून शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न केला. तसंच स्थानिक ग्रामस्थ आणि इतर गिर्यारोहकांच्या मदतीने त्याला डोंगरावरून खाली आणण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले. मात्र, तोपर्यंत उशीर झाला होता. घटनेची माहिती मिळताच खालापूर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन पवार आणि प्रभारी पोलिस विशाल पवार घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने मृतदेह खाली आणत उत्तरीय तपासणीसाठी खालापूरच्या शासकीय रुग्णालयात पाठवून दिला. दरम्यान, पोलिसांच्या प्राथमिक अंदाजानुसार उष्माघात किंवा हृदयविकाराचा झटका हे मृत्यूमागील कारण असू शकतं. मात्र, उत्तरीय तपासणी अहवाल आल्यानंतरच मृत्यूचं नेमकं कारण स्पष्ट होणार आहे.



सध्या राज्यात उष्णतेची लाट सुरू असल्याने प्रशासनाकडून नागरिकांना गिर्यारोहण करताना विशेष काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. ट्रेकिंगला जाताना पुरेसं पाणी, ग्लुकोज आणि प्राथमिक उपचार साहित्य सोबत ठेवावं, तसंच दुपारी १२ ते ४ या वेळेत गिर्यारोहण टाळावं, असं आवाहन प्रशासनाने केलं आहे. रितेशच्या अचानक झालेल्या मृत्यूमुळे त्याच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, मित्रपरिवार आणि महाविद्यालयीन परिसरातही शोककळा पसरली आहे.

सध्या राज्यभरात उन्हाचा कडाका असून या वाढत्या तापमानात आपण शक्यतो सह्याद्रीत गिर्यारोहण करणं किंवा फिरणं टाळलं पाहिजे. अनुभवी मंडळींनाही या उन्हात त्रास होतो. त्यामुळे नवख्या मंडळींनी या गोष्टीची विशेष काळजी घ्यायला हवी. सह्याद्रीत ट्रेकिंगचा आनंद घ्यायचा असेल तर रात्रीच्या वेळीही ट्रेकिंग केली जाते. अनुभवी मंडळींसोबतच हा ट्रेक करावा आणि सोबत मुबलक प्रमाणात पाणी, खाऊ, प्रथमोपचाराचं साहित्य ठेवावं. आपल्या शरीराच्या क्षमतेनुसारच ट्रेक करावा, असा सल्ला गिर्यारोहक भूषण पवार यांनी दिला आहे.

# बनावट जन्मदाखला प्रकरणात एमआयएम नगरसेवक जाळ्यात

**छ.संभाजीनगर | प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगरमध्ये एमआयएमच्या अडचणी दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या वतीने एआयएमआयएम नगरसेवक मतीन पटेल यांचे घर आणि कार्यालय आज (बुधवारी) सकाळी बुलडोझरने पाडण्यात आले.



ही कारवाई महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामाच्या प्रकरणात केली आहे. अशातच हे प्रकरण ताजं असतानाच आता एमआयएमचे नगरसेवक मेराज खान जलील खान गंभीर आरोपांमुळे पोलिसांच्या जाळ्यात अडकले आहेत. निवडणूक शपथपत्रात तिसऱ्या अपत्याची माहिती जाणीवपूर्वक लपवणे, खोट्या जन्म प्रमाणपत्र दाखल्यावर बोनाफाईड प्रमाणपत्र तयार करून शासनाची फसवणूक करणे आणि खोटी माहिती सादर करून निवडणूक लढवल्याचा आरोप मेराज खान यांच्यावर करण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणी सिटी चौक पोलिसांनी मेराज खान यांच्यासह एका शाळेच्या मुख्याध्यापकाला अटक केली असून आणखी पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उर्वरित पाच आरोपींचा देखील शोध सुरू असून आम्ही त्यांना लवकरच ताब्यात घेऊ अशी माहिती पोलीस उपआयुक्त पंकज अंतुलकर यांनी दिलीय.

छत्रपती संभाजीनगरमध्ये नाशिक कार्पोरेट जीहाद मधील आरोपी निदा खानला लपवण्यामध्ये एमआयएमच्या नगरसेवक मतीन पटेल याचं नाव समोर आलं आणि पक्ष अडचणीत आला.

अशातच आता त्यात आणखीन एक भर पडलीय. एमआयएमच्या आणखी एका नगरसेवकाला अटक करण्यात आली आहे. मिराज खान जलील खान असं या नगरसेवकाचे नाव आहे.

महानगरपालिका निवडणुकीत नगरसेवकपद अबाधित ठेवण्यासाठी दोनपेक्षा जास्त अपत्ये असल्याचा नियम धाब्यावर बसवून, स्वतः च्या तिसऱ्या मुलाला सख्ख्या भावाचा मुलगा असल्याचे भासवल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

यासाठी बनावट जन्मदाखला आणि शाळेचे खोटे बोनाफाईड सर्टिफिकेट तयार करून शासनाची आणि मनपाची फसवणूक केल्याप्रकरणी एमआयएमचे नगरसेवक मेराज खान, त्यांच्या पत्नी, भाऊ, भावजय आणि एका शाळेच्या मुख्याध्यापकासह सात जणांविरुद्ध शहर चौक पोलीस ठाण्यात गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# डीजेवर डान्स केल्याचा राग; पतीने पत्नीचा खून करून घेतली गळफासाने आत्महत्या

**नांदेड | प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून राज्यात सतत काही ना काही घडत आहे. कोणी पतीचा छळ करत आहे तर कुठे पती पत्नीची हत्या करत आहे. नांदेड जिल्ह्यातील हिमायतनगर तालुक्यातून अशीच एक धक्कादायक घटना घडली आहे.

ही घटना काळजाचा थरकाप उडवणारी आहे. चुलत भावाच्या लग्नात डीजेवर नाचल्याच्या कारणावरून पतीने आपल्या पत्नीची हत्या केली आणि त्यानंतर स्वतःदेखील टोकाचे पाऊल उचलले. आता नेमकं काय घडलं होतं? जाणून घ्या

भोकर तालुक्यातील फुलवाडी तांडा येथील रहिवासी असलेले विनोद रंगराव राठोड (४०) आणि त्यांची पत्नी पायल विनोद राठोड (२७) हे एका लग्नासाठी बोरगडी तांडा येथे आले होते. १० मे रोजी लग्नादरम्यान पायल यांनी डीजेवर डान्स केला होता, जो विनोद यांना आवडला नाही. याच कारणावरून दोघांमध्ये कडाक्याचे भांडण झाले होते. भांडणानंतर पायल आपल्या मुलांसह माहेरी (बोरगडी तांडा) निघून गेल्या होत्या. मात्र, विनोद यांच्या मनातील राग शांत झाला नव्हता. मंगळवारी पहाटे ३ वाजेच्या सुमारास विनोद यांनी झोपेत असलेल्या पायल यांचा चाकूने



गळा चिरून खून केला. पत्नीची हत्या केल्यानंतर त्यांनी गावाच्या शिवारात जाऊन एका झाडाला गळफास लावून आत्महत्या केली.

या भीषण हत्याकांड आणि आत्महत्येमुळे राठोड कुटुंबातील दोन मुली आणि एका आठ महिन्यांच्या चिमुकल्याचे छत्र हरपले आहे. आई-वडिलांच्या या टोकाच्या निर्णयामुळे ही तीन निष्पाप मुले आता पोरकी झाली असून, संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

सकाळी पायल यांचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात आढळल्यानंतर ही घटना उघडकीस आली. त्यानंतर शोध घेतला असता विनोद यांचाही मृतदेह झाडाला लटकलेल्या अवस्थेत सापडला. हिमायतनगर पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## थोडक्यात

### बालगृहातील ७१५ बालके दहावीत उत्तीर्ण; मंत्री आदिती तटकरे यांच्याकडून अभिनंदन !

**मुंबई । प्रतिनिधी**

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत बालगृहातील ७१५ विद्यार्थ्यांनी दहावीत यश संपादन करत सकारात्मक जीवनाचा मार्ग अवलंबिला आहे. महिला व बालविकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या विविध बालगृहातील एकूण ७१५ विद्यार्थ्यांनी दहावीत यश संपादित केले असून महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, या विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून सकारात्मक जीवनाचा मार्ग स्वीकारत उल्लेखनीय यश मिळवले आहे. विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठी शासनाकडून आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल. तसेच बालगृहांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा, मार्गदर्शन आणि समुपदेशन उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. बालगृहातील या मुलांचे ऑनलाईन सेशन घेण्यात आले, तसेच त्यांचा सराव घेण्यात आला. शिक्षकांचे विशेष वर्ग या दहावीच्या मुलांसाठी आयोजित करण्यात आले होते. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक ११८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यानंतर मुंबई उपनगर येथील बालगृहातील ८८, अहिल्यानगर येथील ८०, तर बीड येथील ४७ विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. ठाणे जिल्ह्यात ४२, सोलापूर येथे ३९, तर कोल्हापूर येथे ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विद्यार्थ्यांनी उच्च गुणांची नोंद केली आहे. कोल्हापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्याने ९५.२० टक्के गुण मिळवले असून द्वितीय क्रमांकाच्या विद्यार्थ्याला ८६ टक्के गुण मिळाले. तसेच बीड जिल्ह्यात प्रथम क्रमांकासाठी ९४ टक्के, तर द्वितीय क्रमांकासाठी ९२.४० टक्के गुणांची नोंद झाली आहे. पुणे, सोलापूर, मुंबई शहर, मुंबई उपनगर आणि धाराशिव या जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनीही ८५ टक्क्यांहून अधिक गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. काही जिल्ह्यांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या कमी असली तरी गुणवत्तापूर्ण निकाल लागल्याचे दिसून आले. नंदुरबार, लातूर, नाशिक आणि नागपूर येथील विद्यार्थ्यांनीही चांगली कामगिरी केली आहे.

### नागरिकांच्या सूचना मागवाव्यात - उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील ऊसतोड कामगारांच्या आरोग्य, आर्थिक आणि सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांच्या कल्याणार्थ सर्वसमावेशक कायद्याचा मसुदा तयार करण्यात आला असून हा मसुदा संकेतस्थळावर प्रसिद्ध करून नागरिकांच्या सूचना व प्रतिक्रिया मागविण्यात याव्यात, असे निर्देश विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.

विधानभवनात ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना व देण्यात येणाऱ्या सुविधाचा आढावा घेण्यासाठी डॉ. गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग उपसचिव वर्षा देशमुख, सार्वजनिक आरोग्य विभाग अतिरिक्त संचालक डॉ. संदीप सांगळे, कामगार विभाग उपायुक्त संकेत कानडे, सार्वजनिक आरोग्य विभाग उपसंचालक डॉ. आशिष भारती, गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ प्रतिनिधी वंदना कोचुरे यांच्यासह महिला आयोगाच्या माजी सदस्य ॲड. संगीता चव्हाण उपस्थित होत्या. यावेळी उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी ऊसतोड कामगारांच्या मूलभूत गरजांकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना दिल्या. कामगारांना गमबूट, इलेक्ट्रिक कोयता, ग्लोव्हज तसेच महिला कामगारांसाठी सॅनिटरी नॅपकिन यासारख्या आवश्यक साहित्याची खरेदी मान्सून सुरू होण्यापूर्वीच करावी व आवश्यक आर्थिक मदत डीबीटीच्या माध्यमातून तात्काळ वितरित करण्यात यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# 'शिवरूद्र शंभुराजे' महानाट्य हे छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास युवा पिढीपर्यंत पोहोचविणारा स्तुत्य उपक्रम - आमदार अमित गोरखे

**पिंपरी । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज यांचे शौर्य, पराक्रम आणि स्वराज्यासाठीचे योगदान सर्वश्रुत असले तरी युवा पिढी आणि शालेय विद्यार्थ्यांना त्यांचा इतिहास जिवंत स्वरूपात अनुभवता यावा, या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महानाट्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे ही कौतुकास्पद बाब आहे. अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी प्रत्येकाने आपल्या परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांना अशा कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी प्रोत्साहित करावे जेणेकरून प्रत्येकापर्यंत हा इतिहास जीवंतपणे अनुभवण्याची संधी मिळेल, असे आवाहन आमदार अमित गोरखे यांनी केले.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या अद्वितीय पराक्रमाची, राष्ट्रनिष्ठेची आणि स्वराज्य रक्षणासाठी दिलेल्या बलिदानाची जाज्वल्य गाथेचा इतिहास उलगडणाऱ्या 'शिवरूद्र शंभुराजे' या भव्य महानाट्याच्या दुसऱ्या प्रयोगास काल प्रारंभ झाला, यावेळी आमदार अमित गोरखे हे बोलत होते.

काल झालेल्या महानाट्याच्या कार्यक्रमास नगरसदस्य तुषार हिंगे, कुशाग्र कदम, अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते सागर तापकीर, राजेंद्र घावटे,संजय कुरबेट्टी, हेमा पारिसकर,जितेंद्र छाबडा यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार अमित गोरखे म्हणाले, छत्रपती संभाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त महानगरपालिका, प्रभागातील नगरसदस्य आणि विविध सामाजिक संघटनांच्या सहकार्याने अतिशय स्तुत्य आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये सामाजिक संघटनांचा देखील सहभाग असून त्यांचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरामध्ये इतिहास घडविणारा आणि ऐतिहासिक ठरणारा हा सांस्कृतिक उपक्रम सर्व लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने सुरू झाला असून तो भविष्यातही अखंडपणे सुरू राहील, असा विश्वास देखील आमदार अमित गोरखे यांनी व्यक्त केला.

१० ते १४ मे २०२६ या कालावधीत चिंचवड येथील बर्ड व्हॅली उद्यान येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विचार प्रबोधन पर्वाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रबोधन पर्वाअंतर्गत ११ ते १३ मे २०२६ यादरम्यान शिपस्पर्श शिवसह्याद्री प्रतिष्ठान निर्मित 'शिवरूद्र शंभुराजे' या महानाट्याचे सादरीकरण होत आहे. इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड होल्डर असलेले



हे महानाट्य ड. विनय चंद्रकांत दाभाडे लिखित व दिग्दर्शित असून प्रतिक चंद्रकांत दाभाडे यांनी सहदिग्दर्शन केले आहे.

तीन मजली भव्य रंगमंच, २०० हून अधिक कलाकारांचा सहभाग, थरारक लढाईचे प्रसंग तसेच महाराष्ट्रातील विविध लोककलांचा समावेश असलेल्या या महानाट्यातून छत्रपती संभाजी महाराजांचा संघर्षमय जीवनप्रवास प्रभावीपणे उभा करण्यात आला आहे. संभाजीनगर, चिंचवड येथील बर्ड व्हॅली उद्यानाच्या मागील बाजूस शिवशंभो उद्यानासमोर असलेल्या मोकळ्या मैदानात सायंकाळी ७ ते रात्री १० या वेळेत हे महानाट्य रंगत आहे. छत्रपती संभाजी महाराज यांचा प्रेरणादायी इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे, स्वराज्याच्या विचारांचे संवर्धन करणे आणि इतिहासाबाबत जनजागृती घडवून आणणे हा या महानाट्याच्या आयोजनामागील प्रमुख उद्देश आहे.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीदिनाचे (१४ मे) कार्यक्रम

गुरूवार दि.१४ मे रोजी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमाद्वारे त्यांना अभिवादन करण्यात येणार आहे. सकाळी १०.३० वाजता महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस तर १०.४५ वाजता बर्ड व्हॅली येथील त्यांच्या पुतळ्यास महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे.या कार्यक्रमास खासदार, आमदार, महापालिकेचे पदाधिकारी,अधिकारी,सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित राहणार आहेत.

तर सायंकाळी ५ वाजता शिवशाहीर सुरेश सुर्यवंशी आसंगीकर यांचा छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित शाहीरीचा कार्यक्रम तर सायंकाळी ७ वाजता सुप्रसिद्ध व्याख्याते नितीन बानगुडे पाटील यांचे छत्रपती संभाजी महाराज-एक अद्वितीय योध्दे या विषयावर व्याख्यान होणार आहे. या सर्व कार्यक्रमांना शहरवासियांनी उपस्थित रहावे असे आवाहन महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.

## पिंपरी चिंचवड क्रीडा क्षेत्रातही देशाला दिशा देणारे शहर ठरतेय - महापौर रवि लांडगे

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड हे केवळ औद्योगिक शहर नसून क्रीडा क्षेत्रातही देशाला दिशा देणारे शहर बनत आहे. आपल्या शहरातील खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवत आहेत, ही प्रत्येक नागरिकासाठी प्रेरणादायी बाब आहे. जयदेव म्हमाणे यांच्यासारख्या खेळाडूंमुळे शहरातील युवा पिढीला नवी ऊर्जा मिळत आहे. अशा खेळाडूंच्या पाठीशी महापालिका कायम ठामपणे उभी राहील, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी चिंचवड शहरातील क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरलेल्या किंग मार्शल आर्ट्स संस्थेच्या विद्यार्थ्यांचा महापौर कार्यालयात महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी स्थायी समिती सभापती अभिषेक



बारणे,सामाजिक कार्यकर्ते नामदेवराव जाधव उपस्थित होते. खेळाडूंना भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासनदेखील यावेळी महापौर रवि लांडगे यांनी दिले.

उत्तर प्रदेशमधील सहारनपूर येथे नुकत्याच भारत-नेपाळ यांच्यात पार पडलेल्या इंडियन इंटरग्रील चॅम्पियन आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताकडून खेळताना थेरगाव येथील चार खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत शहराचा गौरव वाढविला. यामध्ये जयदेव म्हमाणे यांनी सुवर्णपदक पटकावत विशेष यश संपादन केले. यापूर्वीही त्यांनी तब्बल ११ सुवर्णपदके जिंकून आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीची छाप उमटवली आहे. त्यांच्या उल्लेखनीय यशाची दखल भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील घेतली असून, हे संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरासाठी अभिमानाचे क्षण असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

यावेळी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे म्हणाले, 'खेळाडूंचे यश हे केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण शहराचा सन्मान असतो. कठोर मेहनत, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर या विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावर पिंपरी चिंचवडचे नाव पोहोचवले आहे. भविष्यात अशा खेळाडूंना अधिक प्रोत्साहन व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील,' असे देखील त्यांनी सांगितले.

## राष्ट्रीय पातळीवरील उत्तुंग भरारी; कु. कबीर राहुल कांबळे भारतीय वन सेवेत (IFS) होणार दाखल..महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सत्कार



**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील मासुळकर कॉलनी येथील कु. कबीर राहुल कांबळे यांनी केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) परीक्षेत देशभरातून १२५ वी रँक मिळवित भारतीय वन सेवा (Indian Forest Service - IFS) पदावर निवड होऊन शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय व प्रेरणादायी यशाबद्दल आज त्यांचा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी महापौर तथा नगरसदस्या वैशाली घोडेकर, नगरसदस्या सारिका मासूळकर तसेच कांबळे यांचे कुटुंबीय उपस्थित होते. उपस्थितांनी कु कबीर कांबळे यांचे अभिनंदन करत त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कठोर परिश्रम, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर मिळविलेल्या या यशामुळे पिंपरी-चिंचवड शहराचा अभिमान उंचावला असून, शहरातील तरुणांसाठी कु. कबीर कांबळे हे प्रेरणास्थान ठरले आहेत.

भारतीय वन सेवेमार्फत देशाच्या पर्यावरण संवर्धन व नैसर्गिक संपत्तीच्या जतनासाठी ते निश्चितच उल्लेखनीय कार्य करतील असा विश्वास महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केला.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये नागरिकांच्या प्रवेशासाठी 'स्वागतम ई-पास' प्रणाली कार्यान्वित

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये नागरिकांना प्रवेश सुलभ करणे, भेटीची डिजिटल नोंद ठेवणे व कार्यालयीन सुरक्षा बळकट करणे या उद्देशाने 'स्वागतम ई-पास' प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या स्वाक्षरीने याबाबतचे आदेश जारी करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालय, मुंबई येथे अभ्यागत व प्रवेश व्यवस्थापनासाठी असणाऱ्या 'डिजी प्रवेश' प्रणालीच्या धर्तीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने 'स्वागतम ई-पास' प्रणाली सुरू केली आहे. या अंतर्गत नागरिकांना घरबसल्या महानगरपालिका कार्यालयात प्रवेशासाठी नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यासाठी नागरिकांनी महानगरपालिकेच्या ु.लिलळपवळर.सीें.ळप या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या 'स्वागतम ई-पास' या लिंकद्वारे आपली नोंदणी करणे आवश्यक आहे.

प्रथमच नोंदणी करणाऱ्या नागरिकांनी स्वतः चे खाते (लॉगिन) तयार करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेमध्ये पूर्ण नाव, राहण्याचा पत्ता, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, मोबाईल क्रमांक तसेच आधार क्रमांक यांची नोंद करावी लागेल. खाते तयार करण्याची प्रक्रिया एकदाच करावी लागते. त्यानंतर प्रत्येक वेळी प्रवेशासाठी स्वतंत्र नोंदणी करता येईल. नोंदणी करताना तसेच पुढील प्रत्येक प्रवेशाच्या वेळी नागरिकांचा मोबाईल क्रमांक ओटीपीद्वारे प्रमाणित केला जाईल.

प्रवेश नोंदणी करताना नागरिकांनी किमान एक आणि कमाल तीन विभागांना भेट देण्याची विनंती नोंदवावी लागेल. नोंदणी करताना नागरिकांना ई-पास काढावयाच्या दिनांकापासून पुढील सात दिवसांपर्यंतचे (शनिवार, रविवार व शासकीय सुट्ट्या वगळून) उपलब्ध दिनांक दिसतील. त्यानुसार आवश्यक दिनांक व विभाग निवडणे बंधनकारक आहे. तसेच नोंदणी पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना त्यांच्या मोबाईलवर प्रवेशासाठी क्यूआर कोड डाउनलोड करता येईल. जर क्यूआर कोड तात्काळ डाउनलोड केला गेला नाही, तरीही तो नागरिकांच्या खात्यामध्ये कायमस्वरूपी उपलब्ध राहील. आगाऊ नोंदणी केल्यास क्यूआर कोड संबंधित प्रवेशाच्या दिवशीच डाउनलोड करता येईल. महानगरपालिका इमारतीच्या प्रवेशद्वारावर क्यूआर कोड स्कॅन करून नागरिकांचा प्रवेश सुनिश्चित केला जाईल. ही प्रक्रिया काही सेकंदांमध्ये पूर्ण होत असल्याने प्रवेशद्वारावर गर्दी किंवा विलंब होणार नाही.

याशिवाय ज्या नागरिकांनी आगाऊ नोंदणी केलेली नाही किंवा खाते तयार केलेले नाही, त्यांनी प्रवेशद्वारावर उपलब्ध क्यूआर कोड स्कॅन करून तात्काळ नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. त्यानंतर प्रवेश देण्यात येईल. या प्रणालीमुळे नागरिकांना कमीत कमी वेळेत इमारतीमध्ये प्रवेश मिळणे तसेच प्रत्येक प्रवेशाची अचूक नोंद महानगरपालिकेकडे राहणे हे उद्दिष्ट साध्य होणार आहे, असे देखील आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

स्वागतम ई-पासबाबत नियमावली

- नागरिकांनी संबंधित अधिकारी/विभागाशी




पूर्वनियोजित भेट निश्चित करूनच स्वागतम ई-पाससाठी अर्ज करावा.

- सुरक्षा विभागाकडून प्रवेशद्वारावर स्वागतम ई-पासची पडताळणी केल्यानंतरच संबंधित व्यक्तीस प्रवेश देण्यात येईल. तसेच ई-पासमध्ये नमूद केलेल्या वेळ, दिनांक व उद्देशासाठीच प्रवेश वैध राहील.

- नागरिकांना कार्यालयीन कामांसाठी विभागांना भेटीची वेळ ही दररोज सकाळी १०:०० ते सायंकाळी ६:०० अशी राहील.

- अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ०६/०४/२०२६ रोजीच्या परिपत्रकान्वये दर मंगळवार व गुरुवार दुपारी ४:०० ते सायंकाळी ६:०० ही वेळ निश्चित करण्यात आलेली असून, फक्त त्याच वेळेस नागरिकांना अधिकारी वर्गाला भेटता येईल.

- सर्व उपोषण तथा आंदोलनासाठी आलेल्या शिष्टमंडळासाठी मुख्य प्रवेशद्वारावर हस्तलिखित प्रवेशपास दिला जाईल.

- सर्व शासकीय/निमशासकीय अधिकारी व कर्मचारी यांना ओळखपत्रावर प्रवेश दिला जाईल. ओळखपत्र नसल्यास ऑनलाईन प्रवेश प्रणालीद्वारे प्रवेश पास काढावा लागेल.

- कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी तसेच सुट्टीच्या दिवशी मनपा कार्यालयामध्ये विभागामार्फत आयोजित केलेल्या बैठकीसाठी आलेल्या सर्व अभ्यागतांसाठी सकाळी १०:०० ते सायंकाळी ६:०० या वेळेमध्ये प्रवेशासाठी संबंधित विभागाचे पत्र असणे आवश्यक आहे. सदर पत्रावर अभ्यागतांची नावे नमूद असणे आवश्यक आहे.

- ई-पासचा गैरवापर, बनावट माहिती किंवा नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांविरुद्ध नियमांनुसार कारवाई करण्यात येईल.

पिंपरी चिंचवड महापालिका मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये भेट देणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. नागरिकांना कमी वेळेत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांच्या प्रवेशाची नोंद असणे आवश्यक आहे. स्वागतम ई-पास प्रणालीमुळे नागरिक कोणत्या विभागाला किती वेळा भेट देतात, याची माहिती मिळणार असून त्यानुसार आवश्यक सुधारणा करण्याची तयारी महापालिका प्रशासनास करणे सोपे होईल. नागरिकांनी या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा आणि प्रशासनास सहकार्य करावे.

-डॉ. विजय सुर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका



# जालना जिल्हा सामान्य रुग्णालयात आरोग्य क्रांती

## आमदार अर्जुन खोतकरांच्या हस्ते MRI आणि CT-स्कॅन सुविधेचे लोकार्पण

**जालना । प्रतिनिधी**

आज दिनांक १२ मंगळवार रोजी दुपारी एक वाजता मिळालेल्या माहितीनुसार महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयाची अंमलबजावणी जालन्यात झाली आहे. जालना येथील शासकीय सामान्य रुग्णालयात आज मंगळवारी एम.आर.आय (चठख) आणि सीटी-स्कॅन (उढ-डलरप) या अत्याधुनिक मशीनचे लोकार्पण माजी मंत्री तथा आमदार अर्जुन खोतकर यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. या सुविधेमुळे आता जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णांना अत्यंत अल्प दरात हाय-टेक तपासणीची सुविधा उपलब्ध झाली आहे.





आतापर्यंत जालन्यातील गरीब आणि मध्यमवर्गीय रुग्णांना एम.आर.आय किंवा सीटी-स्कॅन करण्यासाठी खाजगी लॅबमध्ये हजारो रुपये मोजावे लागत होते. अनेकदा वेळेवर पैसे उपलब्ध नसल्यामुळे उपचारास विलंब होऊन रुग्णांच्या जिवाला धोका निर्माण होत असे. मात्र, शासनाच्या या निर्णयामुळे आता शासकीय जिल्हा रुग्णालयातच ही सुविधा उपलब्ध झाल्याने सामान्य जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे.

उद्घाटन प्रसंगी बोलताना आमदार खोतकर म्हणाले की, मुख्यमंत्री आणि आरोग्य मंत्र्यांच्या विशेष प्रयत्नातून प्रत्येक जिल्ह्यात अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे देण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे. जालन्यातील रुग्णांना आता छत्रपती संभाजीनगर किंवा इतर मोठ्या शहरांकडे धाव घेण्याची गरज उरणार नाही. अत्यंत अल्प दरात, किंबहुना गरजू रुग्णांना शासनाच्या विविध योजनांतून मोफत उपचार मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

जिल्हा रुग्णालयात बसवण्यात आलेल्या मशीन या उच्च क्षमतेच्या असून, यामुळे रोगाचे अचूक निदान होण्यास मदत होणार आहे. आपत्कालीन परिस्थितीतील रुग्णांसाठी ही सुविधा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. या कार्यक्रमाला शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब गोरे, डॉ. राजेंद्र पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक, वैद्यकीय महाविद्यालयाच्या डीन मडम,

डॉ.राजेंद्र गाडेकर अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक, डॉ. प्रदीप कुलकर्णी रेडिओलॉजिस्ट, डॉ. वायाळ , डॉ.मनोज जाधव, तसेच कृष्णा इमेजिंग सेंटर व्यवस्थापक व तांत्रिक अधिकारी कर्मचारी रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक उपस्थित होते.

लोकार्पण सोहळ्यानंतर आमदार खोतकर यांनी स्वतः मशीनच्या कक्षाची पाहणी केली आणि कर्मचाऱ्यांना रुग्णांना तात्काळ चांगल्या सेवा देण्याच्या सूचना केल्या. जालना जिल्ह्याच्या आरोग्यासाठी आजचा दिवस हा मैलाचा दगड ठरला असून, या सुविधेमुळे आरोग्य यंत्रणेवरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

## संक्षिप्त

### अनधिकृत बाईक टॅक्सी प्सवर कारवाई करा - मंत्री सरनाईक

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांविरोधात परिवहन विभागाने कठोर भूमिका घेतली असून, ओला, उबर आणि रॅपिडोसारख्या अनधिकृत बाईक टॅक्सी प सेवा तत्काळ बंद करून संबंधित कंपनी मालकांवर एफआयआर दाखल करण्याची मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सायबर क्राईम विभागाकडे पत्राद्वारे केली आहे. त्याचबरोबर परिवहन आयुक्त यांनी देखील यासंदर्भात सायबर क्राईम विभागाकडे पत्र पाठविले आहे.

मंत्री सरनाईक यांनी पत्रात नमूद केले आहे की, राज्यात गेल्या काही महिन्यांपासून विविध प्सच्या माध्यमातून कोणतीही वैध परवानगी, शासन मान्यता किंवा परिवहन विभागाच्या नियमांचे पालन न करता प्रवासी वाहतूक सुरू आहे. विशेषतः रॅपिडोसारख्या संस्थांच्या अनधिकृत बाईक टॅक्सींचे प्रमाण वाढत असून, ही बाब सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आहे.

या अनधिकृत सेवांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षिततेची कोणतीही हमी नसून चालकांची पडताळणी, विमा संरक्षण, महिला सुरक्षाविषयक उपाययोजना तसेच आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अत्यंत अपुरी असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, शासनाच्या परिवहन नियमांचे खुलेआम उल्लंघन करून या प्समार्फत आर्थिक व्यवहार सुरू असल्याने परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांच्या व्यवसायावर अन्यायकारक परिणाम होत असल्याचे परिवहन विभागाने म्हटले आहे. सायबर क्राईम विभागाकडे करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये अनधिकृत बाईक टॅक्सी प्सचे ऑनलाईन संचालन तात्काळ बंद करणे, संबंधित प कंपन्या, चालक आणि व्यवस्थापनाविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायदा व मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई करणे तसेच कंपनी मालकांवर गुन्हे दाखल करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे.

### जलसंधारण अधिकाऱ्यांसाठी वाल्मीमध्ये प्रशिक्षण अनिवार्य करणार - मंत्री संजय राठोड

**मुंबई । प्रतिनिधी**

जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) येथे मृद व जलसंधारण विभागातील सर्व अधिकाऱ्यांसाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम आणि अभ्यासवर्ग अनिवार्य करण्यात यावेत, अशा सूचना मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिल्या. मंत्रालयात आयोजित मृद व जलसंधारण विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीस मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर यांच्यासह वाल्मीचे अधिकारी तसेच मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्री राठोड म्हणाले की, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) ही राज्यातील जलसंधारण आणि भूमी व्यवस्थापन क्षेत्रातील महत्त्वाची प्रशिक्षण संस्था असून तिच्या उपलब्ध जागेचे योग्य नियोजन करून अधिक प्रभावीपणे प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात यावेत. क्षेत्रीय पातळीवर कार्यरत अधिकाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, जलव्यवस्थापन, मृदसंवर्धन आणि विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत नियमित प्रशिक्षण मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रत्येक अधिकाऱ्यांसाठी किमान दहा ते बारा दिवसांचे प्रशिक्षण अनिवार्य करण्यात यावे, तसेच क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांना प्राधान्याने प्रशिक्षण देण्यात यावे, अशा सूचनाही मंत्री राठोड यांनी यावेळी दिल्या.

प्रशिक्षणामुळे अधिकाऱ्यांची कार्यक्षमता वाढून जलसंधारणाच्या योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होईल, तसेच वाल्मी संस्थेच्या परिसराचा सर्वांगीण विकास करून कृषी पर्यटनासारखे उपक्रमही राबविण्यात यावेत, असेही मंत्री राठोड यांनी सांगितले.

## १८ मे महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी**



महिला व बाल विकास विभागाने, समस्या व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळण्यासाठी त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतूने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्यात येतो. तालुकास्तरावर प्रत्येक तहसिल कार्यालयात महिन्याचे चौथ्या सोमवार आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या तिस-या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यासाठी दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु इच्छिणाऱ्या महिलांनी आपली तक्रार दोन प्रतित महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय जालना येथे दाखल करण्याचे आवाहन केले आहे.

अर्ज स्वीकृतीचे निकष पुढीलप्रमाणे तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे, तक्रार निवेदन दोन प्रतित सादर करावे, सदरील प्रकरण न्याय प्रविष्ठ नसावे, अर्ज विहित नमुन्यात व आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावा, सेवा व आस्थापना विषयक बाबी विचारात घेतल्या जाणार नाहीत. निवडणुक आचार संहिता काळात त्या त्या स्तरावर, विधीमंडळ अधिवेशन काळात राज्यस्तर महिला लोकशाही दिन पाळण्यात येत नाही.

महिलांनी प्रथम संबंधीत तहसिलदार यांच्याकडे महिला लोकशाही दिनाच्या पंधरा दिवस आधी दोन प्रतीत तक्रार दाखल करावी. तालुका महिला लोकशाही दिनात एका महिन्यांचे आत कार्यवाही न झाल्यास संबंधीत महिला जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु शकतील. तालुकास्तरावरील लोकशाही दिनांत अर्जदार महिलेस अंतिम उत्तर शक्य तितक्या लकर जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत देण्याचे बंधन संबंधित अध्यक्ष तथा तहसिलदार व सदस्य सचिव तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची राहील. महिलांनी तक्रार अर्ज दाखल करण्यासाठी तालुकास्तरावर तहसिल कार्यालय व जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याशी संपर्क करुन

या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## अशोक अण्णा पांगारकर कुणाच्या सांगण्यावरून निच हरकत करतो, त्याचा मि निषेध करतो

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिका कार्यालयात झालेल्या गोंधळ आणि राड्यानंतर आता राजकीय आरोप-प्रत्यारोप अधिक तीव्र झाले असून, भाजप नगरसेवक महावीर ढक्का यांनी स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर यांच्यावर गंभीर आरोप करत संपूर्ण प्रकारासाठी त्यांनाच जबाबदार धरले आहे.

महावीर ढक्का यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, जायकवाडी जलाशयावरून येणाऱ्या पाणीपुरवठा योजनेच्या कामामध्ये कंत्राटदार अगरवाल जी यांना बदलण्याचा प्रयत्न सुरू होता. मात्र, शहरहिताच्या दृष्टीने आपण त्या निर्णयाला विरोध केला. मी कंत्राटदार अग्रवाल जी यांना बदलण्याच्या निर्णयाविरोधात ठाम भूमिका घेतली आणि त्यानंतरच वादाची ठिणगी पडली, असा दावा त्यांनी केला.

ढक्का यांनी अशोक पांगारकर यांच्यावर अप्रत्यक्षपणे बाहेरील दबावाखाली काम करत असल्याचा आरोपही केला. अशोक अण्णा पांगारकर कुणाच्या सांगण्यावरून 'ना हरकत' देतात, हे जालन्याच्या जनतेने पाहिले आहे. मी अशा प्रकारच्या कारभाराचा जाहीर निषेध करतो, अशा शब्दांत त्यांनी संताप व्यक्त केला.



महापालिकेतील सभागृहात झालेल्या गोंधळाबाबत बोलताना ढक्का म्हणाले की, परिस्थिती अधिक चिघळू नये म्हणून आम्ही संयम बाळगला. भाजप नेते कैलास गोरंट्याल यांनी मध्यस्थी करत समजावून सांगितल्यामुळे आम्ही पोलिसांत तक्रार दाखल केली नाही. अन्यथा या प्रकरणाला वेगळे वळण लागले असते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी आपल्या प्रभागातील विकासकामांबाबतही नाराजी व्यक्त केली. माझ्या प्रभागातील अनेक विकासकामांचे प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. कालच्या बैठकीत फक्त तीन पत्रके चर्चेसाठी ठेवण्यात आली. नागरिकांच्या प्रश्नांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात आहे, असा आरोप त्यांनी केला.

सभागृहात झालेल्या कथित मारहाणीच्या आरोपांनाही ढक्का यांनी फेटाळून लावले. आमच्या मुलांनी कोणतीही मारहाण केलेली नाही. उलट प्रतीक पांगारकर यांच्या हातात धारदार शस्त्रे होती, असा गंभीर आरोप त्यांनी करत संपूर्ण घटनेची सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तपासणी करून निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली.

दरम्यान, जालना महानगरपालिकेतील या प्रकारामुळे शहराच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून, सत्ताधारी भाजपमधील अंतर्गत संघर्ष आता उघडपणे समोर येत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. विकासकामे, कंत्राटे आणि स्थायी समितीतील निर्णयप्रक्रिया यावरून वाढत चाललेला संघर्ष भविष्यात

आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## महापालिकेत शस्त्र घेऊन जाणाऱ्या नगरसेवकाचे नगरसेवक पद रद्द करण्यासाठी सुमोटो कायद्यानुसार प्रस्ताव दाखल करा - शिवसेना आमदार अर्जुन खोतकर

**जालना । प्रतिनिधी**

आज दिनांक १२ मंगळवार रोजी दुपारी एक वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना महानगरपालिकेत काल झालेल्या नगरसेवकांमधील धक्काबुक्की आणि राड्यानंतर राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, शिवसेना आमदार -ेिर्क्षीप घर्हेींज्ञरी यांनी या प्रकरणावर आक्रमक भूमिका घेतली आहे. महापालिकेत गुंड शिरल्यानंतर असंच होणार, असा थेट आरोप करत त्यांनी शस्त्र घेऊन महापालिकेत प्रवेश करणाऱ्या नगरसेवकाचे सदस्यत्व रद्द करण्याची मागणी केली आहे.



खोतकर यांनी महापालिका प्रशासनावरही गंभीर सवाल उपस्थित करत, महापालिकेसारख्या संवेदनशील ठिकाणी शस्त्र आत येतातच कसे? असा प्रश्न उपस्थित केला. संबंधित नगरसेवकाविरोधात सुमोटो कायद्यानुसार कारवाई करून त्याचे नगरसेवक पद रद्द करण्यासाठी महापालिका आयुक्तांनी तातडीने राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवावा, अशी मागणी त्यांनी केली.

महापालिकेत सध्या नवा विरुद्ध जुना असा संघर्ष उफाळून आल्याचेही खोतकर म्हणाले.

भाजप हा स्वतःला शिस्तबद्ध पक्ष म्हणवतो, मग त्यांच्या नगरसेवकांकडून अशी गुंडागर्दी कशी होते, असा टोला लगावत भाजपने अशा प्रकारांना पाठीशी घालू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

महापालिकेतील कालच्या गोंधळानंतर शहरातील राजकीय वातावरण अधिकच ढवळून निघाले असून, या प्रकरणावरून आरोप-प्रत्यारोपांची जोरदार मालिका सुरू झाली आहे.

## छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडून अभिवादन

**मुंबई । प्रतिनिधी**

स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे, अवर सचिव रामदास कोळेकर, सहायक कक्ष अधिकारी राजेंद्र बच्छाव, अमोल चव्हाण, विजय शिंदे यांच्यासह मंत्रालयातील



अधिकारी-कर्मचाऱ्यांनी यांनीही छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर यांच्यासह ९ जणांवर जातीवाचक शिवीगाळ केल्या प्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी**

आज दिनांक १२ मंगळवार रोजी दुपारी दोन वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना महानगरपालिका कार्यालयात काल झालेल्या राड्या प्रकरणी नगरसेवक महावीर ढक्का यांच्यासह ११ ते १२ जणांवर प्रतीक पांगारकर यांच्या फिर्यादीवरून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता.दरम्यान नगरसेवक महावीर ढक्का यांच्या भाच्याच्या फिर्यादीवरून स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर यांच्यासह ९ जणांवर जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महानगरपालिकेतील वाद आता थेट गुन्हेगारीच्या पातळीवर पोहोचल्याचे चित्र समोर आले आहे. महापौर कक्षात झालेल्या गोंधळानंतर एका तरुणावर जीवघेणा हल्ला, जातीवाचक शिवीगाळ आणि सोन्याची चैन हिसकावल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून, या घटनेमुळे शहराच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मस्तगड परिसरातील आकाश राजू दुलगज हा तरुण सोमवारी दुपारी महानगरपालिकेत टॅक्स भरण्यासाठी गेला होता. त्यावेळी महापौर कक्षातून आरडाओरड ऐकू आल्याने तो तेथे गेला. तेव्हा काही जण नगरसेवक महावीर ढक्का यांच्यासोबत वाद घालत असल्याचे त्याने फिर्यादीत नमूद केले आहे. वाद सुरू असताना मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आकाश दुलगज याला जातीवाचक शिवीगाळ





करण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच त्याच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करून मारहाण करण्यात आली. एवढेच नव्हे तर त्याच्या गळ्यातील सुमारे १२.५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन हिसकावून घेतल्याचाही आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून कदीम जालना पोलीस ठाण्यात प्रतिक पांगारकर, लखन ठाकूर, अशोक पांगारकर, विजू पांगारकर आणि इतर काही जणांविरोधात कलम ११८(१), ११९(१), ११५(२), ३५२, ३५१(२), १८९,१९०, १९१(२), ३(१)(ी), ३(१)(ी), ३(२)(ींर) कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गतही गुन्हा नोंदविण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान, जालना महापालिकेत सातत्याने होत असलेल्या राड्यांमुळे प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, महापालिका की आखाडा? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड, मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**